जनसंपर्क कक्ष
2 3 MAR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराज हे आद्य व्यवस्थापन गुरू : डॉ. जाधवर

## विद्यापीठात 'वाणिज्य, व्यवस्थापन शाखांचा विकसनशील अर्थव्यवस्थेतील सहभाग'वर राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रयतेच्या समस्या जाणून घेऊन त्याप्रमाणे योजना आखणारे धोरणकर्ते म्हणून छत्रपती शिवरायांची ख्याती आहे. कमी संख्याबळ व तांत्रिकदृष्ट्या कमी दर्जाची साधने असूनही त्यांनी गनिमी काव्याच्या आधारे शत्रूला नामोहरम केले. त्यांच्या अफाट कर्तृत्वामुळे आजही ते कोट्यावधी लोकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान आहेत. व्यवस्थापन शास्त्रानुसार छत्रपती शिवाजी महाराज हे आद्य व्यवस्थापन गुरू आहेत, असे मत पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेचे माजी अधिष्ठता डॉ. सुधाकर जाधवर यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागामध्ये आयोजित 'वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखांचा विकसनशील अर्थव्यवस्थेमधील सहभाग' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

डॉ. जाधवर म्हणाले, बळाचा वापर चांगल्याबरोबरच वाईटासाठीही होऊ शकतो; परंतु याला जर चांगल्या विचारांची जोड मिळाली, तर बल आणि बुद्धी यांचा वापर समाजाच्या भल्यासाठी करता येईल. भारतामध्ये गेल्या अनेक शतकांपासून विविध क्षेत्रांत संशोधन केलेले आहे. अगदी वैद्यकीय क्षेत्रापासून व्यवस्थापन क्षेत्रामध्ये भारतीयांनी वर्षानुवर्षे संशोधन केलेले आहे. परंतु, आजकाल पाश्चात्त्य देशांच्या अंधानुकरणामुळे आपण आपले स्वत्व हरवून बसलो आहोत.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, वाणिज्य व व्यवस्थापन हे सर्व क्षेत्रात सहायक भूमिका बजावू शकते. त्यामुळे तंत्रज्ञान, व्यवस्थापन यांनी हातात हात घालून काम करणे आवश्यक आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, उद्योजक एम. बी. शेख आदींनी यावेळी माहिती दिली. गोवा, मुंबई, कर्नाटक व गुजरात या राज्यांतून एकूण १३७ प्रतिनिधींनी चर्चासत्रात सहभाग नोंदवला. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. स्वागत डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. आभार डॉ. केदार मारुलकर यांनी मानले.

23 MAR 2018 Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Over 2.5L students to appear for SUK's summer semester exams

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The summer semester examination of Shivaji University, Kolhapur (SUK) commenced from Thursday across Sangli, Satara and Kolhapur districts. Officials of the exam department said over 500 examinations are likely to be conducted in 42 days.

Board of Examinations and Evaluation director Mahesh Kakade said, "The exams held on Thursday saw poor student strength. As the schedule progresses, exams will go on in full swing. The under-graduate examinations along with a few post-graduate subjects will start in the first phase." From Thursday, exams of BA, BCom and BSc courses have begun.


Kakade said the system of sending an update of the student's presence or absence, which was implemented in during the examination held last winter, will continue this year too.

Last semester, SUK had introduced a new SMS system, wherein the students absent on the day of an exam are sent an SMS notifying about their absence. University officials had said the system was created so as to address post-examination disputes of the students on the day the examination is held rather than looking into the matter after the exam.

**EXAM FEVER**

Pic: Rahul Gaikwad

| | | | |
|---|---|---|---|
| Annual examinations | More than 500 | No. of affiliated colleges | 283 |
| Answer sheets assessed | Around 12 lakh | No. of students | Around 2.5 lakh |



Kakade added more conventional courses (BSc, BCom and BA) have under been brought under the purview of secured remote paper delivery (SRPD) system under which the question papers are directly sent to the respective exam centre online in an encrypted format. "Infact, on the first day of the exam, around 120 exam centres received the question papers via SRPD," he said.

The varsity is aiming to finish the exams within 50 days, as it has done in the last few semester exams.

Kakade added the examinations, which were conducted in a span of 79 days three years ago, has been systematically brought down to 56 days and now 42 days.

He further added over 200 examination centres have been fixed across Sangli, Satara and Kolhapur districts in the division for conducting the examination.

"We are estimating over three lakh students to appear for over 500 examinations in this semester. The re-evaluation applications have almost been complied and will be looked into at the earliest," said Kakade.

The examination official further added SUK will continue with the 'no supplement' policy in the semester examination to be held in March for all courses. Instead of the supplement, SUK has increased the number of pages in an answer sheet to 40 that will apply for all courses.

Kakade added for keeping a tab on the copying incidents, six flying squads have been appointed.

SUK has overall 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts. Over 2.5 lakh students are studying more than 30 courses in various colleges.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2018
लोकमत

# शिवाजी विद्यापीठातील स्वच्छतागृह चकचकीत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारत, विविध अधिविभाग, अतिथिगृह आणि वसतिगृहांमध्ये एकूण ३४० स्वच्छतागृहे आहेत. रोज दोनवेळा त्यांची स्वच्छता केली जाते.

मुख्य प्रशासकीय इमारत, विविध ३९ अधिविभाग, परीक्षा भवन, क्रीडा विभागात एकूण पुरुषांसाठी १३०, तर महिलांसाठी १०० आणि अतिथिगृहात ३० स्वच्छतागृहे आहेत. मुलांचे वसतिगृह, विद्यार्थी भवन, तंत्रज्ञान, अधिविभागातील मुलांचे वसतिगृह आणि विद्यार्थिनींच्या वसतिगृहांमध्ये प्रत्येकी ४० स्वच्छतागृहे आहेत. प्रशासकीय विभागात सकाळी साडेदहा, दुपारी अडीच, तर वसतिगृहांमध्ये सकाळी अकरा, दुपारी तीन यावेळेत साफसफाई केली जाते.



शिवाजी विद्यापीठातील स्वच्छतागृहे सुस्थितीत, स्वच्छ आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात आज राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि नेहरू अभ्यास केंद्राच्या वतीने शुक्रवारी (दि. २३) सकाळी अकरा वाजता 'भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि आयडिया ऑफ इंडिया' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र इमारतीमधील अर्थशास्त्र सभागृहामध्ये परिसंवाद होईल. परिसंवादाच्या उद्घाटन सत्रामध्ये 'भारतीय क्रांतिकारक आणि आयडिया ऑफ इंडिया' या विषयावर दत्ता देसाई हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिसंवादास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

## राष्ट्रीय परिसंवाद आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि नेहरु अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. २३) सकाळी ११ वाजता भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि आयडिया ऑफ इंडिया या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील अर्थशास्त्र सभागृहामध्ये हा कार्यक्रम होणार आहे. भारतीय क्रांतिकारक आणि आयडिया ऑफ इंडिया या विषयावर दत्ता देसाई हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिसंवादास उपस्थित रहावे, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 MAR 2018
लोकमत

## विद्यापीठात परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे आज, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता राष्ट्रीय परिसंवाद होणार आहे.भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि आयडिया ऑफ इंडिया' असा या परिसंवादाचा विषय आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र सभागृहातील या परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ अभ्यासक दत्ता देसाई हे मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 MAR 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाचा नेहरू अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता. २४) 'पंडित नेहरूंची कल्याणकारी धोरणे व त्यांची अंमलबजावणी' विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी अकराला त्यास सुरवात होईल. डॉ. वासंती रासम यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होईल. प्राचार्य आनंद मेणसे बीजभाषक म्हणून मार्गदर्शन करतील. चर्चासत्रास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

23 MAR 2018

लोकमत

# विद्यापीठामध्ये चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नेहरू अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभागातर्फे उद्या, शनिवारी 'पंडित नेहरूंची कल्याणकारी धोरणे व त्यांची अंमलबजावणी'या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. सकाळी अकरा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात या चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. वासंती रासम यांचे हस्ते होणार आहे. बीजभाषक म्हणून प्राचार्य आनंद मेणसे यांचे मार्गदर्शन लाभेल.